Page :
Date : / /

महाविद्यालय विकास समितीच्या २०१८-१९ सत्रातील प्रथम सभेचे इतिवृत्त (दि. ३ सप्टें. २०१८)

सुचना क्र. सीडीसी/३ दि. २८ ऑगस्ट २०१८ नुसार आज दि. ३ सप्टे. २०१८ ला दु १२.०० वाजता सीडीसी समीतीच्या २०१८-१९ सत्रातील प्रथम सभा संस्थाअध्यक्ष मान. डॉ. दिपा बडगे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्था सचिव मा. श्री मिलींद बलखंडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

सभेला उपस्थित पदाधिकारी (नावे व सह्या)

१) श्री. एम. एल. बलखंडे — Milind Balkhande 3/9/18
२) प्राचार्य, डॉ. जे. आर. संतोषी — [signature]
३) श्री. एम. जी. वाहाणे — [signature]
४) कु. डॉ. एस. एस. शंभरकर — [signature]
५) श्री. एन. पी. सिंगाडे — [signature]
६) श्री. एन. जी. जाधव — [signature]
७) श्री. आर. जी. राऊत — Raut
८) श्री. डॉ. एम. एम. बंन्सु — [signature]
९) श्री. एस. एम. नंदागवळी — [signature]
१०) श्री. डॉ. व्ही. के. राखडे

[signature]
सभाध्यक्ष
महाविद्यालय विकास समीती

(पेज. क्र. १५ वर →)

Page :
Date : / /

- पेज क्र. १४ वरून पुढे -

विषय क्र.१ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर करणे.

ठराव क्र.१ :- महाविद्यालय विकास समीतीचे सचिव, प्राचार्य डॉ.संतोषी ह्यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचुन दाखविले. त्यानुसार नॅकसंबंधीची कामे पुर्णत्वाच्या मार्गावर असुन, डॉ. सौ. वानखेडे ह्यांचेवर नेमण्यात आलेल्या चौकशीचे काम पूर्ण झाले. महाविद्यालयात नविन ब्रॉडबॅंड कनेक्शन घेण्यात आले असुन ग्रंथालयासह कार्यालयाला नेट सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. नॅक समीतीने महाविद्यालयाला भेटीची तारिख दि. २४ व २५ सप्टे.२०१८ निश्चित केलेली आहे. नविन कोर्सेस, पदव्युत्तर विभाग सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडे चौकशी केली असता महाविद्यालयाचे नॅक व कायम संलग्निकरण असने आवश्यक असल्याने पुढील याबाबतची कार्यवाही सध्या थांबवावी लागली. पदव्युत्तर सुरु करण्यासाठी विषय प्राध्यापक आचार्य पदवीधारक असावा. मागील ठरावानुसार महाविद्यालयात कॅन्टीन सुरु करण्यात आलेली आहे. मागील झालेल्या सभेत ठरविल्याप्रमाणे बहुतेक सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली. तसेच २०१७-१८ चे ऑडीट रिपोर्ट महाविद्यालयाचा लेखा सांभाळणारे मुख्यलिपीक ह्यांनी तयार केलेला आहे मात्र मागील ठरावाअनुसार २०१८-१९ चे बजेट (अंदाजपत्रक) तयार करण्यास नकार दिल्यामुळे आज सभेपुढे मांडता आले नाही अशी माहिती श्री.एस.एम.नंदागवळी ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना प्राचार्यांनी सांगितली. ह्यावर सभेत

— पेज नं. १६ वर -

Page : 
Date : / /

- पेज नं. १५ वरुन पुढे -

चर्चा होवुन हे लेखा सांभाळणाराचे काम असल्याने त्यांना याबाबत तात्काळ पत्र देण्यात यावे अशी सभाध्यक्षांनी सूचना दिली. व ठराव क्र.१ सर्वानुमते पारित करण्यात आले.

विषय क्र.२ :- २०१७-१८ सत्रातील ऑडीट रिपोर्टवर चर्चा करणे

ठराव क्र.२ :- लेख्याचे काम सांभाळणारे श्री लिचडे अत्यावश्यक कामाने रजेवर असल्याने त्यांच्या सुचनेने व प्राचार्यांच्या आदेशाने श्री लाडे ह्यांनी सभेपुढे ऑडीट अहवाल, आय व खर्च इत्यादींची मुख्य हेडनुसार माहिती वाचुन दाखविली. तेव्हा संस्थासचिवांनी ऑडीट अहवाल पाहुन काही हेडवरिल अतिरिक्त खर्चाबाबत चिंता व्यक्त केली व प्राचार्यांना नोंदी घेण्यास सांगीतले. यावर सभेत चर्चा होवुन शेवटी अतिरिक्त खर्च तपासणीसाठी त्री-सदस्यीय समीती नेमावी व समितीने आपला अहवाल प्राचार्य व संस्थेला सादर करावा असे सभाध्यक्षांच्या सुचनेनुसार सभेने ठरविले. ऑडीट वच्चनानुसार प्राचार्यांकडून ॲड. लोन किती व का घेण्यात आला ह्या श्री वाहाणे ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, कधीकधी जमेपेक्षा अचानक खर्च लेखा पुस्तीकेनुसार जास्त असल्यास प्राचार्यांकडून ॲडव्हान्स लोन दाखवावा लागतो व नंतर घेतलेला लोन परत ~~देवून~~ ~~असतो~~ दिल्या जातो अशी माहिती श्री लाडे ह्यांनी सभेला दिली. तेव्हा ऑडीट अहवालानुसार घेतलेल्या ॲडव्हान्स लोन पेक्षा परत केलेल्या लोनची राशी कमी दिसत असल्यामुळे हा प्रश्न आला असावा असे राऊत ह्यांनी आपले मत स्पष्ट केले. अशाप्रकारे ह्या ठरावावर चर्चा होवून ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

पेज क्र. १६ वर →

Page :
Date : / /

– पेज क्र. १६ वरुन पुढे –

विषय क्र.३ :- नॅकच्या कामाबाबत चर्चा करणे

ठराव क्र.३ :- नॅकसंबंधीची आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती को-ऑर्डीनेटर श्री नंदागवळी ह्यांनी सभेला दिली. 'कॅरिअर गाईडन्स सेल' साठी स्पर्धा परिक्षेच्या पुस्तकांची आवश्यकता असल्याचे कु.डॉ. शेंभरकर ह्यांनी दिली. तसेच कॅम्प्युटर लॅब मध्ये १० कॅम्प्युटर असावेत असे को-ऑर्डीनेटर नी सांगितले तेव्हा काही कॅम्प्युटर बंद असल्यामुळे ३ ते ४ कॅम्प्युटर कमी असल्याची माहिती कु.डॉ. शेंभरकर ह्यांनी सांगितली, ~~ते~~ नॅकसाठी काहीदिवसापर्यंत, नंदा कॅम्प्युटर चे चालक श्री नंदागवळी पुरवणार आहेत. अशी माहिती प्राचार्यांनी दिली. एका पीसी मधून काही सामानही गेल्याचे डॉ.कु शेंभरकर ह्यांनी सांगितले. नॅक झाल्यानंतर बिनादुरुस्त कॅम्प्युटर दुरुस्त करावेत असे ठरवून सर्वांच्या सम्मतीने ठराव पारित झाले

विषय क्र.४ :- कॅन्टीनबाबत चर्चा करणे :-

ठराव क्र.४ :- प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार कॅन्टीन सुरु झालेली आहे. मात्र कॅन्टीनमधील चहा, फराळ ह्याचा दर्जा तेवढा चांगला नाही. दर्जा सुधारण्यास सांगण्यात यावे असे संस्था सचिव श्री बलखंडे सर ह्यांनी सूचना दिल्या. तसेच करारानुसार लिहिण्यात आलेले हमीपत्र बरोबर आहे मात्र ते स्टॅम्पपेपरवर असावे असे सुचवून ~~सर~~ सभाध्यक्षानी हमीपत्रानुसार त्यांनी कागदपत्रांची पूर्तता करावी असे सांगितले आणि सर्वांनी अनुमती दर्शवून ठराव पारित झाला.

– पेज क्र. १८ वर –

- पेज नं.१७ वरुन पुढे -

विषय क्र.५ :- अभ्यागत (CHB) शिक्षकांच्या मान्यता प्रस्तावाबाबत

ठराव क्र.५ :- २०१८-१९ सत्रात घेण्यात आलेल्या अभ्यागत शिक्षकांची माहिती सभाध्यक्षांनी घेतली. व त्यांचे मान्यता प्रस्ताव या महिन्यात विद्यापीठाकडे पाठविण्यात यावीत- असे आजच्या सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र.६ :- माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करणे :-

ठराव क्र.६ :- वरिल विषय सभेपुढे चर्चेला आल्यावर, या समीतीमधील सदस्य श्री डॉ. एम.एम. बंन्सु हयाच गावातील असुन या समीतीत माजी विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, दुय्यम सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे चौकशी करणे करुन, माजी विद्यार्थी संघा चे रजिस्ट्रेशन करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवावी अशा सभाध्यक्षांनी केलेल्या सुचनेस सर्वानुमते संम्मती दर्शविण्यात आली व ठराव संम्मत झाला.

विषय क्र.७ :- अध्यक्षाच्या परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठराव क्र.७ : सभाअध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयात खालिल प्रमाणे चर्चा करण्यात आली व ठराव पारित करण्यात आले.

(अ) आजच्या CDC च्या सदस्यांना दिलेल्या नोटीसात कोणताही अजेंडा कां देण्यात आला नाही ! अशी CDC च्या सचिवांना श्री.नंदागवळी सदस्य हयांनी विचारणा केली व हया प्रश्नास डॉ.राखडे, सदस्य हयांनी दुजोरा दिला व नोटीसावर अजेंडा असल्यास सदस्यांना त्यावर विचार करणे, आपले मत मांडणे सोईचे होते असे मत व्यक्त केले. यापुढे अजेंडा देण्यात येईल असे प्राचार्यांनी सभेला

- पेज नं.१९ वर →

Page :
Date : / /

- पेज क्र.१८ वरून पुढे -

सांगुन हरकतीचे समाधान केले.

ब) विद्यार्थी संख्या वाढली असल्याने अतिरिक्त कामेही वाढलेली आहेत. ॲडमीशन, नामांकन, नियमित विद्यार्थ्यांचे परिक्षा फॉर्म ठराविक मुदतीत ऑनलाईन अपलोड करणे व सादर करणे इ. मुदतीतील कामे असुन असलेल्या ऑपरेटरकडे नॅक, माजी विद्यार्थ्यांच्या परिक्षा फॉर्मची कामे, प्राध्यापकांची कामे भरपूर असल्याने वरिल कामात त्यांची फारशी मदत होत नाही. तेव्हा कमीतकमी वरिल कामासाठी ४ ते ५ दिवस मोकळे करावे अशी विनंती श्री राऊत, सदस्य ह्यांनी केली व सभेने ते मान्य करून प्राचार्यांना सुचना देण्यात आल्या.

क) माजी व नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षाबाबत चर्चा करणे

परिक्षेची कामे कोणाकडे आहेत ! परिक्षाशुल्का व्यातिरीक्त कोणते शुल्क घेतले जातात ! घेतलेले (सर्व शुल्क) बँकेत जमा केले जाते काय ! अंदाजे किती शुल्क जमा होतो. इत्यादी बाबत आजच्या सभेत चर्चा करण्यात आली. व यासंदर्भात श्री राऊत सदस्य ह्यांनी पूढील माहिती सभेपुढे सांगीतली.

श्री लिचडे (मु.लिपीक) माजी, बहीःशाल विद्यार्थ्यांच्या परिक्षेचे काम करित असुन माझेकडे फक्त नियमीत विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे कामे आहेत. परीक्षा शुल्का सोबत ऑनलाईन चार्जेस रु.५०/- वेगळे घेण्यास मला सांगण्यात आले त्यानुसार जमा झालेली राशी मी मुख्यलिपीकाकडे जमा करित असतो, त्यांपैकी किती बँकेत जमा केली जाते ह्याची मला कल्पना नाही. परिक्षाशुल्का व्यतिरीक्त, ऑनलाईन (रु.५०/- प्रती) चार्जेस सर्व विद्यार्थ्यांकडून (नियमित व माजी) तसेच सेवाशुल्क व परिक्षा फॉर्म ~~रु.~~ रु.४०/- व परिक्षा फॉर्मचे रु.१००/-

— पेज नं.२०१९ —

- पेज क्र.१९ वरुन पुढे -

फक्त माजी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येतात. मागील सत्रात नियमित विद्यार्थ्यांच्या हिवाळी परिक्षेत सर्व वर्गमिळुन सेमीस्टरच्या ४ परीक्षा व उन्हाळी परिक्षेत सेमीस्टरच्या ४ व वार्षिकची - २ एकुण १० परीक्षा घेण्यात आल्या तर माजीविद्यार्थ्यांच्या सर्व वर्गमिळुन हिवाळी परीक्षा एकुण - ६ तर उन्हाळीच्या - ६ एकुण - १२ असे हिवाळी व उन्हाळीच्या (नियमित व माजी) सर्व मिळुन - २२ परिक्षा घेण्यात आल्या.

वरील सर्व परिक्षार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन चार्जेस अंदाजे रु.९००००/- ते १,००,०००/- जमा झाले असावेत. हे कोणत्या खर्चात लागले हे मला सांगता येणार नाही. असे श्री राऊत ह्यांनी सभेला माहिती दिली व ह्यावर्षी विद्यार्थीसंख्या वाढीमुळे ऑनलाईन चार्जेस ची (हिवाळी व उन्हाळी परीक्षा) नियमीत व माजी परीक्षार्थी मिळुन रु.१,००,०००/- ते १,२०,०००/- जमा होतील असा अंदाज व्यक्त केला.

वरिल सर्व विस्तृत चर्चेनुसार परिक्षेची सर्व कामे (नियमीत व माजी) एकाकडेच असावीत अशी प्रा.वाहाळे, ~~सदस्य~~ सदस्य ह्यांनी सभेपुढे सूचना मांडली. व ह्याला सर्वांनी दुजोरा दिला. प्रथमत: सध्या माजी परिक्षार्थ्यांचे कामे श्री लिचडे करित असल्यामुळे सर्व परीक्षांचे नियमित विद्यार्थ्यांचे कामे त्यांचेकडेच देण्यात यावीत. व त्यांनी नकार दिल्यास पत्र देऊन त्यांचेकडून ही कामे काढून घेण्यात यावीत व श्री राऊत ह्यांचेकडे सोपवावी. असे प्रा.नेहारकर ह्यांनी सभेला सुचविले व सर्वांनी त्यास मान्यता दिली.

वरिल सर्व बाबींवरील निष्कर्षावरुन परीक्षेचे कामे एकाकडेच असावीत, जमा झालेले परीक्षाशुल्क (ऑनलाईन चार्जेस, सेवाशुल्क, परिक्षाफॉर्म शुल्क असल्यास) इत्यादीसह बँकेत जमा करण्यात यावीत.

- पेज क्र.२१ वर -

Page :
Date : / /

– पेज क्र. २० पासून २६ –

परीक्षा शुल्क विद्यापीठाला जमा करण्यात यावे. नियमानुसार सेवा शुल्क काम सांभाळणाऱ्यास देण्यात यावे. शिल्लक राशीमधून नियुक्त असलेल्या कॉम्प्युटर ऑपरेटरचे ठरावीक मानधन देण्यात येत, व उर्वरीत राशी प्राचार्यांच्या परवानगीने महाविद्यालयाच्या कामात वापरावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

वरिलप्रमाणे १ ते ७ विषय आजच्या सभेत चर्चिले गेले यावर साधक-बाधक चर्चा झाली व सर्व ठराव एकमताने पारित करण्यात आले. शेवटी आपल्या सर्व स्टॉफच्या कार्यकुशलतेने व मान. व्यवस्थापन मंडळाच्या निर्देशानुसार नॅक समीतीची भेट दि. २४,२५ सप्टें.२०१८ ला निश्चित झाली असुन आपणास नॅककडून चांगला ग्रेडेशन मिळेलच अशी आशा व्यक्त करुन मान. सभाध्यक्षाच्या परवानगीने, चहा-फराळानंतर आजची सभा संपल्याचे प्राचार्य डॉ. संतोषी (सचिव, CDC) यांनी जाहीर केले व सभा संपविण्यात आली.

दि. ०३ सप्टें. २०१८
स्थळ - महाविद्यालयाचे संगीत विभाग खोली

सचिव
महाविद्यालय विकास समीती
डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ
आर्टस ॲण्ड कॉमर्स, पवनी.

सभाध्यक्ष
महाविद्यालय विकास समीती
डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ
आर्टस ॲण्ड कॉमर्स, पवनी.

पदाधिकारी
१) सदस्य मान. एम. एल. बलखंडे सर
२) –॥– श्री. एम. जी. वाहाणे

– पेज क्र. २९ १२ –

Page : .
Date : / /

- पेज क्र २१ वरुन पुढे -

३) सदस्य - डॉ. कु. एस. एस. शंभरकर [signature]

४) -"- श्री. एन. पी. सिंगाडे [signature]

५) -"- श्री एन. जी. जाधव [signature]

६) -"- श्री. आर. जी. राऊत [signature]

७) -"- ॲड. डी. एन. गोवर्धन - गैरहजर

८) -"- डॉ. व्ही. के. राखडे

९) -"- डॉ. एम. एस. बांसु [signature]

१०) -"- श्री. एस. एस. भोगे - गैरहजर

११) -"- श्री. एस. एम. नंदागवळी [signature]

१२) -"- ए. एन. हरडे - गैरहजर

१३) -"- कु. पी. बी. अलोने - गैरहजर

L.D. Balkhande Arts & Commerce College, Dist. Bhandara, PAUNI



Page :
Date : / /

महाविद्यालय विकास समीतीच्या २०१८-१९ सत्रातील द्वितीय सभेचे इतिवृत्त (दि. २३ मार्च २०१९)

सुचना क्र सीडीसी/५ दि. १४।०३।२०१९ नुसार आज दि. २३ मार्च २०१९ ला दु. १२.०० वाजता सीडीसी समीतीची २०१८-१९ सत्रातील द्वितीय सभा संस्थाअध्यक्षा मान. डॉ. दिपा बडगे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्था सचिव आद. श्री मिलींद बलखंडे सर यांच्या प्रमुख उपस्थितील प्राचार्यकक्षात घेण्यात आली.

सभेला उपस्थित पदाधिकारी (नावे व सह्या)

१) श्री एम एल बलखंडे — Milind Balkhande 23/3/19
२) प्राचार्य डॉ. जे. आर संतोषी
३) श्री एम जी वाहाणे
४) कु डॉ. एस एस शंभरकर
५) श्री एन पी सिंगाडे
६) श्री एन जी जाधव
७) श्री आर जी राऊत
८) डॉ. एम एम बन्सु
९) श्री एस एम नंदागवळी
१०) श्री डॉ. डी के राखडे
११) लोकेश ए बालुलवार
१२) दिनेश पी वावनकर
१३) ॲड डी.एन गोवर्धन

सभाध्यक्ष
महाविद्यालय विकास समीती

→ पेज क्र २४

Dist. Bhandara
College



Page :
Date : / /

विषय क्र.१ - मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर करणे.
ठराव क्र.१ - दि. ३ सप्टे. २०१८ च्या सभेतील ठराव क्र. २नूसार सत्र २०१७-१८ मध्ये अतिरिक्त खर्चाच्या तपासणीकरिता त्री सदस्यीय समीती गठीत करणे व हिशोब तपासणे. ठराव क्र.३ नुसार नॅक करणे, नॅक करण्यात येवून महाविद्यालयाला "C" ग्रेड मिळाले. कॅन्टीन चालविण्याकरिता दुसऱ्या व्यक्तीला सोपविणे. माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करणे. परिक्षेचे कार्य श्री राहुल बाबुकडे सोपविणे, यासंबंधीची रक्कम रोजच्या रोज बॅंक खात्यात जमा करणे. या विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. आणि ठराव क्र.१ सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र.२ - नॅक रिपोर्टवर चर्चा करणे
ठराव क्र-२ नॅक पिअर समीतीद्वारा सुचविलेल्या सूचनांची पूर्तता करण्यासंबंधी चर्चा करण्यात येवून लवकरात लवकर सूचनांची पूर्तता करण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

विषय क्र.३ - ग्रंथालयाच्या सोयी सुविधांवर चर्चा करणे.
ठराव क्र.३ - विद्यार्थी विकास लक्षात घेता ग्रंथालयात ब्राडबॅन्ड, संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षेसंबंधी पुस्तके, ग्रंथपेढी इ. सोय उपलब्ध करावे याबाबत चर्चा करण्यात येवून यासंबंधाने सोयी उपलब्ध करण्यात यावे. असे सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र.४ - शारिरीक शिक्षण विभागाच्या सोयी बाबत चर्चा करणे

→ पेज क्र.२५

Page :
Date : / /

पेज क्र २४ वरुन पुढे

ठराव क्र. ४ - महाविद्यालयातील क्रिडा मैदान अपुरे असल्याने शासनाचे क्रिडासंकुलाचा उपयोग करता यावा याकरिता शासनाची परवानगी घ्यावी यावर चर्चा करण्यात येवून, विद्यार्थी हिताचा विचार करुन शासनाद्वारा क्रिडा संकुल वापरण्याची परवानगी लवकरात लवकर घ्यावी- असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

विषय क्र. ५ - शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीविषयी चर्चा करणे.

ठराव क्र ५- रिक्त असलेल्या शिक्षकांची पदे भरण्यात यावी. तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार अधिक्षक, मुख्यलिपिक, वलिपिक पदोन्नती देण्यात यावी. आणि रिक्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती बाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून शिक्षकांच्या पदभरती प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वरिल तिनही पदावर क्रमाने पदोन्नती द्यावी. असे सर्वानुमते ठराव पारीत करण्यात आले.

विषय क्र. ६ - उपहार गृह (कॅन्टीन) चालविण्याबाबत चर्चा करणे

ठराव क्र ६- महाविद्यालयातील उपहारगृह श्री. चव्हाण यांना काही अटीवर चालविण्यास देण्यात आली होती परंतु त्यांच्या द्वारा कॅन्टीन योग्यप्रकारे चालविण्यात येत नसल्याने, कॅन्टीन दुसऱ्या व्यक्तीला द्यावी यावर चर्चा करण्यात आली. आणि सत्र २०१९-२० पासुन कॅन्टीन चालविण्याचे काम प्रामाणिक व्यक्तीला देण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. ७ - सत्र २०१९-२० च्या बजेटवर चर्चा करणे

ठराव क्र. ७ - विद्यार्थी प्रवेश फी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन

→ पेज क्र २६

- पेज क्र.२५ वरुन पुढे -

प्राध्यापकांची बाबत चर्चा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेश फी द्वारा प्राप्त रकमेतुन विद्यापीठाला देय रक्कम तसेच वेतनखर्च वेळोवेळी करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

विषय क्र.८ - मा. अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठराव क्र.८ - १) महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत चर्चा करण्यात येवून कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पदोन्नती देण्यात यावी. असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

२) पी.एच.डी. झालेल्यांना इंक्रीमेंट द्यावी तसेच ज्यांनी निवडश्रेणीच्या संदर्भात कालखंड पूर्ण केलेला आहे अशा लोकांना त्याचा लाभ मिळावा, याबाबत चर्चा करण्यात आली आणि चर्चेअंती दि.१ जाने २०१६ नंतर नियमानुसार पीएचडी धारकांना इंक्रिमेंट देता येत नाही. आणि ज्यांची निवडश्रेणीचा कालखंड पूर्ण झाले त्यांना लाभ देण्यात यावा असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सभेअंती मान. अध्यक्ष महोदयांनी सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येकांनी आपआपली जबाबदारी पूर्ण करण्याचे प्रयास करावेत. यासंबंधात पुरुष वा महिला असा भेद करु नये. एनएसएस च्या शिबिरावेळी महिलांनी सहकार्य करणे अनिवार्य आहे. मान. अध्यक्षाच्या परवानगीने सभा संपली असे प्राचार्यांनी सांगितले आणि सर्व सदस्यांना धन्यवाद दिले.

सचिव तथा प्राचार्य
म.वि.समीती

Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni, Dist. Chandara

अध्यक्ष
म.वि. समीती